**Government Polytechnic, Aurangabad.**
(An Autonomous Institute of Govt. of Maharashtra)
Osmanpura, Aurangabad - 431005
Phone: (Office) (0240) 2334724, (P) 2353644
website: www.gpabad.ac.in
E-mail: : principal.gpaurangabad@dtemaharashtra.gov.in

GOVERNMENT POLYTECHNIC AURANGABAD
PURSUIT FOR EXCELLENCE

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र./शातंनिऔ/EC/2022/ 309 दिनांक — 12/09/2022

**महत्वाचे परिपत्रक :**

**विषय : उन्हाळी परीक्षा 2022 (212) चा निकाल जाहीर झाल्यानंतर अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष 2022-2023 मध्ये पुढील सत्र/वर्षांचे सत्रकर्म पूर्ण करण्यासाठी एक वेळ संधी उपलब्ध करून देणेबाबत.**

संदर्भ : 1) उच्च व शिक्षण विभाग यांचे पत्र क्र.विमंनी-2022/(प्र.क्र. 63/22)/तांशि-5, दिनांक 29/08/2022.
2) जा.क्र. मरातंशिमंडळ/का-51/एकवेळ संधी/2022/5193 दिनांक 29/08/2022.

उन्हाळी परीक्षा-2022 च्या निकालानुसार संस्थेच्या परीक्षा नियमावलीतील तरतुदीनुसार पुढील सत्र/वर्षाकरीता प्रवेशास अपात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष 2022-2023 मध्ये सदर सत्र/वर्षाचे सत्रकर्म पूर्ण करण्यासाठी कोविड-19 च्या पार्श्वभूमीवर विद्यार्थी हितास्तव एक विशेष बाब म्हणून एक वेळ संधी देण्याबाबत उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये शासनाने मान्यता दिलेली आहे.

त्याअनुषंगाने या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, **संस्थेच्या** परीक्षा नियमावली नियम **ER-2** नुसार उन्हाळी परीक्षा-2022 च्या निकालानंतर पुढील वर्षात प्रवेशाकरीता अपात्र असलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष 2022-2023 करीता सदर सत्र/वर्षाचे सत्रकर्म पूर्ण करण्यास कोविड-19 च्या पार्श्वभूमीवर विद्यार्थी हितास्तव अपवादात्मक परिस्थितीत खालील अटींच्या अधिन राहून एक विशेष बाब म्हणून एक वेळ संधी (**One Time Opportunity**) उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्याचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे

A] **Backlog Courses** साठी परीक्षा नोंदणी करणे.

| **अ.क्र.** | **तपशील** | **कालावधी** |
|---|---|---|
| 01 | विद्यार्थ्यांनी स्वत:च्या **Login** मधून **Summer 212** परीक्षेत **Fail** असलेल्या विषयांचे अर्ज निश्चित आवश्यक ते शुल्क भरून निश्चित करणे. (**Rs.** 600/-) | 14/09/2020 ते 16/09/2022 |
| 02 | **One Time Opportunity** अंतर्गत पात्र असलेल्या विद्यार्थ्यांचे तिस-या व पाचव्या सत्राकरीता स्वत:च्या विषय नोंदणी करणे. | 19/09/2022 ते 21/09/2022 |

1. सदरची एक वेळ संधी विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक वर्ष 2022-2023 मध्ये सत्रकर्म पूर्ण करून घेण्यासाठीच आहे. पदविका अभ्यासक्रमातील तिसरे व पाचवे सत्र जे विद्यार्थी संस्थेच्या परीक्षा नियम **ER-2** नुसार पूर्ण करतील त्यांनाच पुढील सत्रामध्ये अनुक्रमे चौथ्या व सहाव्या सत्रात प्रवेश देण्यात येवून सत्रकर्म पूर्ण करून घेण्याची संधी देण्यात येईल.

2. तिस-या व पाचव्या सत्रात सत्रकर्म पूर्ण न केल्यामुळे जे विद्यार्थी थोपवले जातील (Detained/Disallowed) त्यांना संधी गमावली आहे, असे समजण्यात यावे व त्यांना अनुक्रमे चौथ्या व सहाव्या सत्रात प्रवेश देता येणार नाही.

3. हिवाळी परीक्षा 2022 मध्ये मागील सत्र/वर्षाच्या अनुत्तीर्ण विषयांत जे विद्यार्थी उत्तीर्ण होतील व संस्थेच्या परीक्षा नियमावलीनुसार पुढील सत्र/वर्षाकरीता प्रवेशास पात्र होतील **त्यांना उन्हाळी परीक्षा 2023 पासून तिस-या व चौथ्या/ पाचव्या व सहाव्या सत्राची परीक्षा देण्यास पात्र राहतील.**

4. उन्हाळी परीक्षा 2022 दरम्यान ज्या विद्यार्थ्यांना गैरप्रकार प्रकरणी शिक्षा झालेली आहे,असे विद्यार्थी सदर एक वेळ संधीकरीता अपात्र राहतील.

5. एक वेळ संधी घेवू इच्छिणा-या विद्यार्थ्यांनी **Online** प्रणालीद्वारे **Course Registration** करणे बंधनकारक राहील. विद्यार्थ्यांनी **Registration** निश्चित केलेल्या विद्यार्थ्यांनाच एक वेळ संधी देण्यात येईल.

6. एक वेळ संधी केवळ सत्रकर्म पूर्ण करून घेण्यासाठीच असल्याने अशा विद्यार्थ्यांनी फक्त **Backlog** च्या विषयांसाठी परीक्षा अर्ज भरावेत.

7. एक वेळ संधीमुळे एका विशिष्ट वर्गात विद्यार्थी संख्या जास्त झाल्यास नियमित तसेच सदर संधी प्राप्त विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये, याकरीता विभागाने वेगळा वर्ग तयार करून शैक्षणिक कामकाज पूर्ण करावी.

8. एक वेळ संधी मिळणा-या विद्यार्थ्यांचे सत्रकर्म पूर्ण करून घेण्याची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. या विद्यार्थ्यांचे अर्ज अभिलेखे (**Record**) ठेवण्याची जबाबदारी विभागाची आहे.

9. ज्या विद्यार्थ्यांनी सत्र पूर्ण केलेले आहे त्यांनी संबंधित विषयाचे Term work/Journal/Drawing जतन करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील. परीक्षेत पात्र झाल्यावर **Oral/Practical** परीक्षेचे वेळी सदर **Term work / Journal / Drawing** सादर करण्याची जबाबदारी सदर विद्यार्थ्यांची राहील.

10. एक वेळ संधी अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यापूर्वी संबंधित विभागप्रमुखांनी विद्यार्थ्यांना / पालकांना याबाबत संपूर्ण मार्गदर्शन करावे व उपरोक्तनुसार याबाबतची अंमलबजावणी करावी.

मगणालकर
**प्र. प्राचार्य,**
शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद.

प्रत : मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद. 2) सहसचिव, तंत्रशिक्षण परीक्षा मंडळ, विभागीय कार्यालय, औरंगाबाद, 3) सर्व विभागप्रमुख यांना माहिती व कार्यवाहीस्तव. 4) विद्यार्थी सूचना फलकावर, 5) विद्यार्थी विभाग.